थोडक्यात...

पावन भिक्षा ग्रंथाचे प्रकाशन

(मधुसूदन सोनवळकर/ दै.धर्मयोध्दा)

बीड - ज्येष्ठ समर्थ भक्त शिलाताई देशमुख यांनी समर्थ रामदास स्वामी कृत आणि पू. स्वामी गोविंद देव गिरि यांनी अनुवादित केलेल्या पावन भिक्षा दे दो राम या चौपाई वर केलेल्या विवेचनात्मक ग्रंथाचे प्रकाशन पुणे येथील वेदश्री तपोवन येथे डॉ. विजय लाड आणि सौ. विद्याताई लव्हेकर (नांदेड)यांच्या हस्ते ७ मे रोजी झाले. '' श्रमाने मिळवलेली पवित्र भिक्षा अंगिकारून राष्ट्रोद्धासाठी आपले जीवन समर्पित करून मिळालेल्या नरदेहाला पावन कसे करावे हे सूत्र रामदास स्वामींचे वांग्मय आपल्याला शिकवते '' असे मत या प्रसंगी दासबोध सखोल अभ्यास फाउंडेशन चे संचालक तथा श्री सुंदर मठ, शिवथरघळ येथील विश्वस्त डॉ. विजय लाड यांनी व्यक्त केले. या वेळी श्रीमती शिलाताई देशमुख यांची अमृत महोत्सवा निमित्त धान्य आणि ग्रंथ तुला करण्यात आली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अनिरुद्ध देशमुख , अंबरीश देशमुख, सिंधू देशपांडे, सुधांशु रथ, अपर्णा देशमुख , स्वानंदी रथ आणि ज्योती प्रसाद देशमुख यांनी परिश्रम घेतले.

ओखा तिरुपती साप्ताहिक एक्सप्रेस नियमित; प्रवाशांना मोठा दिलासा

(असद शेख/दै.धर्मयोध्दा)

पुर्णा – पश्चिम रेल्वेने चालवत असलेली ओखामदुराई विशेष साप्ताहिक रेल्वे आता नियमित करण्यात आली असून, ती गाडी क्रमांक १९५६०/१९५५९ ओखातिरुपतीओखा साप्ताहिक एक्सप्रेस म्हणून धावणार आहे. या निर्णयामुळे गुजरात, महाराष्ट्र, तेलंगणा आणि आंध्र प्रदेशातील प्रवाशांना नियमित आणि विश्वासार्ह रेल्वे सेवा उपलब्ध होणार आहे. गाडी क्रमांक १९५६० ओखातिरुपती साप्ताहिक एक्सप्रेस ही ११ मे २०२६ पासून (सोमवार) नियमित धावण्यास सुरुवात केली आहे. ही गाडी दर सोमवारी रात्री २३.३५ वाजता ओखा स्थानकातून सुटेल. ती द्वारका, जामनगर, राजकोट, अहमदाबाद, आनंद, वडोदरा, नंदुरबार, जळगाव, भुसावळ, अकोला, वाशिम, हिंगोली, बसमत, पूर्णा, नांदेड, बासर, निजामाबाद, काचेगुडा, गडवाल, कर्नुल सिटी, ढोणे मार्गे बुधवारी रात्री २३.३० वाजता तिरुपती येथे पोहोचेल दुसऱ्या बाजूला, गाडी क्रमांक १९५५९ तिरुपतीओखा साप्ताहिक एक्सप्रेस ही १४ मे २०२६ पासून (गुरुवार) नियमित होईल. ही गाडी दर गुरुवारी सकाळी ०८.१५ वाजता तिरुपतीहून सुटेल आणि शनिवारी सकाळी ११.५० वाजता ओखा येथे पोहोचेल. गाडीची रचना एकूण २० डब्यांची ही गाडी खालीलप्रमाणे असेल: १ एसी द्वितीय श्रेणी (-२) ३ एसी तृतीय श्रेणी (-३) १० सामान्य द्वितीय श्रेणी डबे ४ शयनयान डबे २ जनरेटर-सह सामानवाहू ब्रेक व्हॅन या नव्या नियमित सेवेमुळे तिरुपती बालाजी मंदिरासह दक्षिण भारतातील धार्मिक स्थळे, पर्यटनस्थळे तसेच व्यावसायिक आणि शैक्षणिक प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांना मोठा फायदा होणार आहे. राजकोट, अहमदाबाद, नंदुरबार, भुसावळ, पूर्णा, काचीगुडा आणि तिरुपती यासारख्या महत्त्वाच्या स्थानकांना थेट जोडणी मिळणार आहे.

एस टी कामगार सेनेच्या राज्य चिटणीसपदी मदन मुंडे

(सचिन रायपत्रीवार/दै.धर्मयोध्दा)

जिंतुर - महाराष्ट्र एस टी कामगार सेनेच्या वर्धापन दिनानिमित्त १० मे रोजी आयोजित कार्यक्रमात संघटनेची नवीन राज्य कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. शिवसेना नेते तथा माजी केंद्रीय मंत्री खासदार अरविंद सावंत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात जिंतूर आगारातील लिपिक मदन मुंडे यांची राज्य चिटणीसपदी निवड करण्यात आली. सरचिटणीस हिरेन रेडकर व कार्याध्यक्ष प्रदीप धुरंदर यांच्या उपस्थितीत ही घोषणा करण्यात आली. एस टी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने लढा देणारे कार्यकर्ते म्हणून मदन मुंडे यांची ओळख आहे. त्यांच्या निवडीमुळे जिंतूर आगारासह परभणी जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांत आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

शेतकऱ्यांना पाणी उपलब्धता वाढविण्यास प्राधान्य द्या : राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर

जलसंधारण व सिंचन क्षमतेसाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचना

(अजहर खान/ दै.धर्मयोध्दा)

सेलू - शेतकऱ्यांना शेतीसाठी पुरेसे पाणी उपलब्ध होण्यासाठी जलसाठा वाढविणे, सिंचन क्षमता विस्तार करणे आणि पाण्याचे प्रभावी व्यवस्थापन करणे अत्यंत आवश्यक असून यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कार्य करावे, असे निर्देश पाणीपुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिले.

मुंबई येथील निर्मल भवनमध्ये एमएसआरडीसी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. बैठकीस दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे संजयसिंह चव्हाण, नतिषा माथुर तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत भूजल पातळी वाढविण्यासाठी व्यापक उपाययोजना राबविण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली. अधिकाधिक क्षेत्र सिंचनाखाली आणण्यासाठी शेतकऱ्यांना पाटाचे पाणी उपलब्ध करून देण्यावर विशेष भर देण्यात आला. तसेच पाणी साठवण क्षमता वाढविण्यासाठी तलाव, तळी, धरणे आणि कालव्यांच्या दुरुस्ती व सक्षमीकरणाची कामे गतीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

पुराचे पाणी साठविण्यावर भर

दरवर्षी मोठ्या प्रमाणावर पावसाचे व पुराचे पाणी वाहून जात असल्याने नद्या व तलावांचे खोलीकरण, नवीन चेकडॅम व बंधारे उभारणे, नाला बांधकाम सुधारणा तसेच पुराचे पाणी प्रभावीपणे साठविण्याचे नियोजन करण्याच्या सूचना राज्यमंत्री साकोरे-बोर्डीकर यांनी दिल्या.

पूरनियंत्रणाची कामे गुणवत्तापूर्ण करण्याच्या सूचना

अनेक गावांना नदीच्या पुराचा धोका निर्माण होत असल्याने अशा ठिकाणी तातडीच्या व कायमस्वरूपी उपाययोजना राबविण्याचे निर्देश देण्यात आले. गावांची सुरक्षा महत्त्वाची असून पूरनियंत्रणाची कामे दर्जेदार व गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करावीत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

जलयुक्त शिवार व गाळमुक्त धरण योजनेवर भर

पाणीटंचाईची समस्या लक्षात घेता सर्व कामांचे नियमित ऑडिट करण्याचे निर्देश देण्यात आले. जलयुक्त शिवार अभियान प्रभावीपणे राबविण्याबरोबरच 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' योजना अधिक परिणामकारकरित्या अंमलात आणण्याच्या सूचना देण्यात आल्या. धरणांतील गाळ काढून तो शेतीसाठी वापरण्यासाठी शेतकऱ्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही करण्यात आले.

पाइपलाइनद्वारे सिंचन व्यवस्थेला प्राधान्य

बैठकीत काही गावे सध्या टँकरद्वारे पाणीपुरवठ्यावर अवलंबून असल्याची माहिती देण्यात आली. भविष्यात पाणी साठवण व्यवस्थेत सुधारणा न झाल्यास आणखी गावांना टँकरची गरज भासू शकते, अशी शक्यता व्यक्त करण्यात आली. अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करून नदीपात्रांचे वैज्ञानिक पद्धतीने रुंदीकरण व गाळ काढण्याची कामे पावसाळ्यापूर्वी नियोजनबद्ध पद्धतीने करण्याचे निर्देश देण्यात आले.

शेतकऱ्यांसाठी सिंचन क्षेत्र वाढविण्याच्या दृष्टीने पाइपलाइनद्वारे पाणी वितरण, प्रेशर इरिगेशन प्रणाली, ठिबक सिंचन आणि कार्यक्षम पाणी वापर तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यावर भर देण्यात आला. बंद पाइपलाइन प्रणालीमुळे पाण्याची गळती कमी होऊन अधिक क्षेत्र सिंचनाखाली आणणे शक्य होईल, असे राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी सांगितले.

पाण्याची बचत, जलसाठा वाढ आणि शाश्वत सिंचन व्यवस्थेमुळे शेती उत्पादनवाढीस चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शालांत परीक्षेत अहिल्याबाईचे विद्यार्थी चमकले!

कु. शहेनाश शेख प्रथम तर अक्षय बनसोडे द्वितीय

(जावेद पटेल/ दै.धर्मयोध्दा)

पुर्णा – नुकताच जाहीर झालेल्या शालांत प्रमाणपत्र परीक्षा (मार्च-२०२६) च्या निकालात तालुक्यातील लक्ष्मणनगर (पिंपळगाव बा.) येथील संजीवनी एज्युकेशन सोसायटीद्वारे संचालित अहिल्याबाई होळकर विद्यामंदिर या शाळेने दरवर्षीप्रमाणे यंदाही उज्वल यशाची परंपरा कायम राखत घवघवीत यश संपादन केले आहे. येथील विद्यालयाचा एकूण निकाल ९५.८३ टक्के लागला असून विशेष प्राविण्यसह दोन विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या परीक्षेत कु. शहनाश फिरोज शेख हिने ८७.४० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला, तर अक्षय गोविंद बनसोडे याने ८१ टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळवला आहे.

या विद्यालयातून प्रथम व द्वितीय श्रेणीत प्रत्येकी ११ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून त्यामध्ये शहनाश फिरोज शेख (८७.४०%), अक्षय गोविंद बनसोडे (८१%), सागर रेनगडे (७३%), ऋतुजा बनसोडे (७१%) व चैतन्या बनसोडे (७०%) यांचा प्रामुख्याने समावेश आहे. यामुळे विद्यालयाने उज्वल निकालाची आपली परंपरा यंदाही कायम राखली आहे. सोमवारी विद्यालयात मुख्याध्यापक कुटे व्ही. के., शिक्षक भुसारे व्ही. के., काळबांडे पी. एम., सावंत एस. बी. तसेच एल. व्ही. शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा सत्कार करण्यात आला व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

प्रथम क्रमांक पटकावलेली कु. शहनाश फिरोज शेख ही लक्ष्मणनगर येथील शेतकरी शेख फिरोज शेख मुजम्मिल यांची कन्या आहे, तर द्वितीय क्रमांक मिळवलेला अक्षय गोविंद बनसोडे हा पिंपळगाव बाळापूर येथील शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष गोविंद बनसोडे यांचा सुपुत्र आहे. दरम्यान, या यशाबद्दल शिवसेना नेते जलील पटेल, माजी जि.प. सदस्य पांडुरंग बनसोडे, तालुका खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष बापूराव घाटोळ, ह.भ.प. राम महाराज बनसोडे, युवासेना तालुकाप्रमुख मुंजाजी उर्फ आप्पा बनसोडे आदी मान्यवरांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

व्यवस्थापनातील वादामुळे शाळा वेठीस!

दरम्यान, शाळा व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना शिवसेना युवासेनेचे तालुकाप्रमुख मुंजाजी उर्फ आप्पा बनसोडे यांनी संजीवनी एज्युकेशन सोसायटीमध्ये सुरू असलेल्या वादामुळे शाळेचे नुकसान होत असल्याबाबत चिंता व्यक्त केली. याबाबत बोलताना ते म्हणाले की, संस्थाचालकांमध्ये संस्थेवर वर्चस्वाबाबत गेल्या काही वर्षांपासून वाद सुरू असून हा वाद न्यायालयापर्यंत पोहोचला आहे. या वादामुळे अहिल्याबाई विद्यामंदिर या शाळेत रिक्त झालेल्या शिक्षकांच्या जागा भरता आलेल्या नाहीत. त्यामुळे ४ ते ५ शिक्षकांवर संपूर्ण शाळेचा भार आला असून त्याचा परिणाम शिक्षणाच्या गुणवत्तेवर होत असल्याचे त्यांनी नमूद केले. शासन व प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देत संस्थाचालकांमधील वाद निकाली काढावा किंवा शाळेत पुरेशा शिक्षकांची नियुक्ती करावी, जेणेकरून या वादाचा परिणाम शाळा व विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होणार नाही, अशी मागणीही बनसोडे यांनी केली.

समाजसेवक आसद खान पठाण यांना 'महाराष्ट्र आयकॉन पुरस्कार २०२६' प्रदान

(दशरथ शिंदे/ दै.धर्मयोध्दा)

मानवत - सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे समाजसेवक मा. आसद खान मुन्नवर खान पठाण यांना 'जनसहयोग सेवाभावी संस्था महाराष्ट्र' तर्फे प्रतिष्ठेचा ''महाराष्ट्र आयकॉन पुरस्कार २०२६'' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार परभणी येथील श्री शिवाजी विधी महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या सन्मानाबद्दल भावना व्यक्त करताना आसद खान पठाण म्हणाले की, ''आयुष्यात काही क्षण असे येतात जे मनात कायमचे घर करून राहतात. महाराष्ट्र आयकॉन पुरस्कार २०२६ हा माझ्यासाठी तसाच अविस्मरणीय क्षण आहे. माझ्या मित्र परिवाराने व सहकाऱ्यांनी मला सतत साथ दिली, योग्य मार्गदर्शन केले, त्यामुळेच हा सन्मान मिळू शकला. मी हा पुरस्कार माझ्या सर्व सहकाऱ्यांना आणि मित्र परिवाराला समर्पित करतो.'' पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, ''हा पुरस्कार मला सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा देईल. माझ्यावर विश्वास दाखवून मला या सन्मानासाठी पात्र ठरविल्याबद्दल जनसहयोग सेवाभावी संस्था महाराष्ट्रचे मी मनःपूर्वक आभार मानतो.'' तसेच परभणी शहराचे लोकप्रिय युवा महापौर इकबाल साहेब यांचेही त्यांनी विशेष आभार व्यक्त केले. ''माझ्यासारख्या समाजसेवकाला पुरस्कार देऊन सन्मानित केल्याबद्दल महापौर साहेब तसेच जनसहयोग सेवाभावी संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे मी ऋणी आहे,'' असेही त्यांनी नमूद केले. या पुरस्कारामुळे समाजसेवा क्षेत्रात कार्य करणाऱ्या युवकांना नवी प्रेरणा मिळत असून विविध स्तरातून आसद खान पठाण यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

जिंतूर शहरात तीव्र पाणीटंचाई; नागरिक त्रस्त

(सचिन रायपत्रीवार/दै.धर्मयोध्दा)

जिंतुर- शहरातील गणपती गल्ली, कोमटी गल्ली, भुजंगवाडी गल्लीसह अनेक भागांत मागील आठ ते दहा दिवसांपासून नळाद्वारे पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. कडक उन्हाळ्यात पाण्यासाठी नागरिकांची मोठी गैरसोय होत असून नगरपरिषद प्रशासनाविरोधात संताप व्यक्त केला जात आहे. येलदरी धरणात मुबलक पाणीसाठा उपलब्ध असतानाही नगरपरिषदेच्या दुर्लक्षामुळे नियमित पाणीपुरवठा होत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. नळाला अत्यल्प दाबाने पाणी येत असल्याने अनेक कुटुंबांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत असून काहींना खासगी टँकर व जारचे पाणी विकत घ्यावे लागत आहे. पाणीटंचाईमुळे नागरिकांना आर्थिक फटका बसत असून नगरपरिषद प्रशासनाने तातडीने लक्ष घालून नियमित व सुरळीत पाणीपुरवठा करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

शॉर्ट सर्किटमुळे भोसा येथील इंद्रायणी किराणा दुकान खाक; महावितरणकडून नुकसानीची पाहणी

(दशरथ शिंदे/ दै.धर्मयोध्दा)

मानवत - तालुक्यातील भोसा येथील विठ्ठल किसनराव जाधव यांच्या इंद्रायणी किराणा दुकानाला लागलेल्या भीषण आगीच्या पार्श्वभूमीवर, महावितरणच्या प्रतिनिधींनी घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली. विद्युत महामंडळाचे प्रतिनिधी श्री. लोहारे यांनी ११ मे, सोमवार रोजी या दुकानाची प्रत्यक्ष पाहणी करून नुकसानीचा आढावा घेतला.नेमकी घटना काय?७ मे २०२६ रोजी रात्री १०:४५ च्या सुमारास दुकान बंद केल्यानंतर शॉर्ट सर्किटमुळे इंद्रायणी किराणा दुकानाला मोठी आग लागली होती. या आगीत

दुकानातील किराणा माल, हार्डवेअर, कपडे, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू आणि वॉटर फिल्टर प्लांट असे मिळून सुमारे ६५ लाख रुपयांचे साहित्य पूर्णपणे जळून खाक झाले आहे.महावितरणच्या प्रतिनिधींकडून पाहणीया घटनेनंतर विठ्ठल जाधव यांनी केलेल्या तक्रारीची दखल घेत, सोमवारी ११ मे रोजी महावितरणचे प्रतिनिधी लोहारे यांनी भोसा येथे भेट दिली. यावेळी त्यांनी आगीमुळे झालेल्या नुकसानीचा पंचनामा व पाहणी केली. शॉर्ट सर्किटमुळेच ही दुर्घटना घडल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत असून, लोहारे यांनी या प्रकरणाचा सविस्तर अहवाल वरिष्ठांकडे सादर करण्याचे आश्वासन दिले आहे.नुकसान भरपाईची अपेक्षा''शासकीय विद्युत वाहिनीतील बिघाडामुळेच माझ्या आयुष्याची पुंजी जळाली आहे,'' असे म्हणत विठ्ठल जाधव यांनी प्रशासनाकडे तातडीने आर्थिक मदतीची मागणी केली आहे. महावितरणच्या या पाहणीनंतर आता पीडित दुकानदाराला न्याय मिळणार का, याकडे संपूर्ण भोसा परिसराचे लक्ष लागले आहे.

हृदयसम्राट बाबा हरदेव सिंह यांना अर्पित 'समर्पण दिवस'

परभणी - मानवतेच्या कल्याणासाठी एखाद्या महान आत्म्याचे संपूर्ण जीवन समर्पित झाले की, त्या व्यक्तिमत्त्वाच्या स्मृती या केवळ इतिहासापुरत्या मर्यादित राहत नाहीत, तर त्या युगानुयुगे जनमानसाला प्रेरणा देणारा दिव्य स्रोत ठरतात. मानवता, प्रेम, विनम्रता आणि आध्यात्मिक जागृतीचे अद्वितीय प्रतीक असलेल्या युगद्रष्टा बाबा हरदेव सिंहजी यांच्या पावन स्मृतीस समर्पित 'समर्पण दिवस' भावपूर्ण वातावरणात बुधवार, दि. १३ मे २०२६ रोजी संत निरंकारी आध्यात्मिक स्थळ, समालखा (हरियाणा) येथे आयोजित करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम सायंकाळी ५ ते रात्री ९ वाजेपर्यंत सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज तथा श्रद्धेय निरंकारी राजपिताजी यांच्या पावन सान्निध्यात संपन्न होईल. त्यानंतर उपस्थित श्रद्धाळूंना सतगुरु माताजींचे आशीर्वचन श्रवण करण्याची संधी लाभणार आहे. देश-विदेशातून मोठ्या संख्येने उपस्थित राहणारे श्रद्धाळू, भक्तगण आणि मानवताप्रेमी या प्रसंगी श्रद्धा,

भक्ती आणि समर्पणाची भावांजली अर्पण करतील. या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण निरंकारी मिशनच्या अधिकृत संकेतस्थळावर करण्यात येणार असून, जगभरातील श्रद्धाळूंना त्याचा लाभ घेता येणार आहे.

बाबा हरदेव सिंहजी हे केवळ संत निरंकारी मिशनचे आध्यात्मिक गुरु नव्हते, तर ते प्रेम, करुणा, सहजता आणि मानवी संवेदनांचे सजीव प्रतीक होते. त्यांच्या मधुर हास्याने, विनम्र व्यक्तिमत्त्वाने आणि दिव्य वाणीतून असंख्य लोकांना आत्मिक शांततेचा अनुभव दिला. आत्मज्ञानाच्या प्रकाशातून त्यांनी समग्र मानवजातीला असा संदेश दिला की, प्रेम, सेवा, सहअस्तित्व आणि समर्पण यांवर आधारलेले जीवनच खऱ्या अर्थाने सार्थक ठरते. त्यांच्या दिव्य नेतृत्वाखाली संत निरंकारी मिशनने समाजसेवेला अध्यात्माशी जोडत रक्तदान शिबिरे, स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, आरोग्यसेवा, शिक्षण, महिला सक्षमीकरण तसेच युवकांच्या ऊर्जेला आध्यात्मिक दिशा देणारे विविध लोककल्याणकारी उपक्रम राबविले. समाजात सकारात्मक परिवर्तनाची सशक्त चळवळ निर्माण करण्यात मिशनने मोलाची भूमिका बजावली. ईश्वरभक्ती ही मानवसेवेतूनच खऱ्या अर्थाने सिद्ध होते, हा बाबाजींचा स्पष्ट दृष्टिकोन होता. सुमारे ३६ वर्षे मिशनचे नेतृत्व करताना बाबा हरदेव सिंहजी यांनी संत निरंकारी मिशनला जागतिक स्तरावर नवी ओळख आणि उंची प्राप्त करून दिली. आज हे मिशन ६७ हून अधिक देशांमध्ये आध्यात्मिक जागृती, नैतिक मूल्ये आणि मानवकल्याणाचा संदेश प्रभावीपणे पोचवत आहे. त्यांच्या तप, त्याग आणि दूरदृष्टीमुळे मिशनला आंतरराष्ट्रीय स्तरावर विशेष सन्मान प्राप्त झाला असून संयुक्त राष्ट्रांच्या सामाजिक व आर्थिक परिषदेचे सल्लागार म्हणूनही प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. ''एकत्वातून सद्भाव'', ''वसुधैव कुटुंबकम्'' आणि ''एकाला जाणा, एकाला माना आणि एक व्हा'' या दिव्य संदेशांद्वारे बाबाजींनी संपूर्ण मानवजातीला प्रेम आणि ऐक्याच्या सूत्रात बांधण्याचा प्रयत्न केला. 'भिंतीविरहित विश्व' ही त्यांची संकल्पना आजही विश्वबंधुत्व, समानता आणि वैश्विक प्रेमाची प्रेरणा देत प्रत्येक हृदयास प्रकाशित करीत आहे.

वर्तमानात सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज त्याच दिव्य परंपरेची धुरा समर्थपणे पुढे नेत असून प्रेम, सेवा, संयम आणि आध्यात्मिक चेतनेचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचवत आहेत. त्यांच्या करुणामय सान्निध्यात संत निरंकारी मिशन मानवतेला आत्मबोध, नैतिकता आणि विश्वबंधुत्वाच्या मार्गावर सातत्याने प्रेरित करीत आहे.

'समर्पण दिवस' हा केवळ श्रद्धांजली अर्पण करण्याचा दिवस नसून, मानवतेला प्रेम, सेवा, विनम्रता आणि समर्पणाच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा देणाऱ्या त्या दिव्य जीवनदर्शनाला आत्मसात करण्याचा एक पावन पर्व आहे. हा दिवस प्रत्येकाच्या अंतःकरणात ही जाणीव जागृत करतो की, महान आत्मा आपल्या कर्मातून, विचारांतून आणि आदर्शांतून सदैव जिवंत राहतात तसेच युगानुयुगे मानवतेचा मार्ग प्रकाशमान करीत राहतात. परभणी येथे समर्पण दिवस १३मे २०२६ रोजी सत्संग आयोजित करण्यात आला आहे. प्रमुख उपस्थिती प. आ. जनार्दन बोरकर जी , प्रचारक (वाशिम) वेळ सायंकाळी ६:००ते ०८:३० ठिकाण : कालिका माता मंदिर हॉल शिवराम नगर शिवशक्ती बिल्डिंगच्या पाठीमागे वसमत रोड परभणी सत्संग ला सर्व जिल्ह्यातील साथ संगत ने उपस्थित राहावे असे आव्हान परभणी जिल्हा संयोजक श्री रमेश जी चव्हाण यांनी केले आहे.

जवाहर विद्यालयाची कु.राधिका रामेश्वरराव खिस्ते एस.एस.सी.परीक्षेत ९८.४०% गुण घेऊन जिंतूर तालुक्यातून प्रथम विद्यालयाचा निकाल ९८.४७%

(सचिन रायपत्रीवार/ दै.धर्मयोध्दा)

जिंतुर- एस.एस.सी परीक्षा फेब्रुवारी २०२६ चा निकाल नुकताच जाहीर झाला असून यात जवाहर विद्यालयाची कु.राधिका रामेश्वरराव खिस्ते ९८.४०% गुण घेऊन जिंतूर तालुक्यातून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे. तर जवाहर विद्यालयाचा निकाल ९८.४७% असा निकाल प्राप्त झाला असून यात ९०% पेक्षा जास्त ५४ विद्यार्थी, ७५% पेक्षा जास्त १७८ विद्यार्थी, विशेष प्राविण्यप्राप्त २३२ विद्यार्थी, प्रथम श्रेणीत १९३ विद्यार्थी द्वितीय श्रेणी ७३ असे एकूण ५१८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

या निकालात कु. राधिका खिस्ते ९८.४०% प्रथम, द्वितीय कु.पुनम बल्लाळ ९८.००%, तृतीय कु.श्रावस्ती लाटे ९७.४०%, कु.सुचिता राऊत ९७.४०%, चतुर्थ यज्ञेश घुगे ९७.००%, पाचवा सुरेश पोटफाडे व इतर ५१२ विद्यार्थी विविध श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. ९०% पेक्षा जास्त ५४ विद्यार्थी, ७५% पेक्षा १७८ विद्यार्थी, विशेष प्राविण्य प्राप्त २३२ विद्यार्थी, प्रथम श्रेणीत १९३ विद्यार्थी, द्वितीय श्रेणीत ७३ विद्यार्थी उत्तीर्ण असे एकूण ५१८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

या यशाबद्दल संस्थेचे सचिव तथा विद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी श्री.खंडेरावजी वटाणे साहेब, प्राचार्य श्री.बळीराम वटाणे सर, संचालक श्री.किशनराव वटाणे सर, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री.ज्ञानेश्वर मते सर, श्री.राजेश वटाणे सर, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

दैनिक धर्मयोध्दा हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक शिंदे रामेश्वर गणपतराव यांनी प्रविण प्रिंटींग प्रेस शॉप नं.१४ सुपर मार्केट, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथे छापून धर्मयोध्दा कार्यालय, विकास नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथुन प्रसिध्द केले. **संपादक-शिंदे रामेश्वर गणपतराव**

DHARMA YODDHA Daily Publisher, Printer, Owner by- Shinde Rameshwar Ganpatrao, Printed at Pravin Printing press Shop No 14 Super Market Karegaon Road Parbhani 431401 (M.S) And Published Dharmayoddha Karyalaya Vikas Nagar,Karegaon Road Parbhani. 431401 (M.S) Editor By - Shinde Rameshwar Ganpatrao